# राज्यसभेतील विरोधी पक्षनेते श्री अरुण जेटली यांची फेसबुक पोस्ट

दि.4 डिसेंबर,2013

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे मतदान पूर्ण झाले. आता आतूरपणे निर्णयाची प्रतिक्षा केली जात आहे. एक्झीट पोलमध्ये असे निर्देश येत आहेत की कॉग्रेसला पाचही राज्यात पराभव स्वीकारावा लागणार आहे. एक्झीट पोल संभावित परिणामच दर्शवत असतात. त्यात खामी असण्याची शक्यता असते. एक्झिट पोलची अशा प्रकारे मर्यादा असूनही तो ट्रेंड सुरु झाला आहे. कॉग्रेसच्या छावणीत संपूर्णपणे हताशा जाणवत आहे. निवडणूकीच्या अंतिम टप्प्यात कॉग्रेसच्या नेत्यांनी दिल्लीत निवडणूक प्रचार करणे सोडून दिले होते. श्रीमती शीला दिक्षीत यांना एकटीलाच लढावे लागले. कॉग्रेसच्या प्रवक्त्यांनी एक्झिट पोल विषयी चर्चेतून काढता पाय घेतला होता. एक्झीट पोल मुळे कॉग्रेसमध्ये एवढी हताशा पसरली आहे, जर वास्तविक परिणाम येतील तेव्हा त्यांची काय स्थिती होईल याची कल्पना केलेलीच बरी.

राजकारणात कधीही अंतिम दिवस होत नाही. प्रवृत्ती सतत चालत असतात. कॉग्रेसने तो प्रयत्नच सोडला होता. दिल्लीतील निवडणुकीत केंद्रीय नेत्यांनी दिल्लीतील नेत्यांकडे दुर्लक्ष केले असे वाटले. केंद्र सरकार आर्थिक अव्यवस्था, भ्रष्टाचाराचे गंभीर आक्षेप, नीति घडवण्याची प्रक्रिया स्थगित करुन, सबळ नेतृत्त्वाचा अभाव वगैरे गोष्टींमुळे कॉग्रेसच्या नेत्यांमध्ये हताशा पसरली आहे. कॉग्रेस पक्षाने या वास्तविकतेचा स्वीकार करेपर्यंत त्यांना योग्य उत्तर मिळणार नाही. राजकारणात कोणाचाही करिष्मा मोठ्या वेळेपर्यंत चालणार नाही. राजकीय पक्ष हा एका परिवाराच्या आसपासचा शंभुमेळा बनला तर त्यामुळे परिवाराच्या क्षमतेप्रती शंका घेतली जाते. तो पक्ष निराशा असलेला पक्ष समजला जातो. निराशा ही कधीच चांगले परिणाम देत नाही तर उलट ती निष्फळ ठरते.

कॉग्रेस पक्ष आगामी 8 डिसेंबर,2013 रोजी येणा-या निवडणुकीच्या परिणामासाठी कोणती प्रतिक्रिया देईल त्याची मी प्रतिक्षा करत आहे. त्या पक्षाची परिस्थिती जवळून पाहिली असता असे समजते की, ते स्वतःला योग्य प्रश्न विचारु शकत नाहीत. असे करत नाहीत तोपर्यंत त्यांना सत्य जाणता येणार नाही. कॉग्रेसची परंपरागत विचारधारा लक्षात घेतली तर त्यांच्या समस्येचे समाधान हे आहे की, परिवाराचा एक सदस्य निष्फळ ठरला तर दुस-या सदस्याच्या मदतीने प्रयत्न केले पाहिजेत.